# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ५२९/२०१९**

**तक्रारकर्ता श्री. जिग्नेश शर्मा**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) १ व ३**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त (पी/उत्तर विभाग) यांचे कार्यालय,
पहिला मजला, लिबर्टी गार्डन, मालाड (प)
मुंबई -४०० ०६४.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता पी/उत्तर**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त (पी/उत्तर विभाग) यांचे कार्यालय,
लिबर्टी गार्डन, मालाड (प) मुंबई -४०० ०६४.

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २८.०३.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित(व्ही.सी.व्दारे) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. नों.क्र. ३१०१/२०१८ रा.मा.आ.अपील क्र. १२९९/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. १२.१२.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहिती अपिलार्थींना १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावी. अपील निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. २७.१२.२०१९ रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) पी/ उत्तर, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. आयुक्त, पी/ उत्तर विभाग यांचे कार्यालय, मालाड (प.), मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. ०७.०१.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) पी/ उत्तर, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. आयुक्त, पी/ उत्तर विभाग यांचे कार्यालय, मालाड (प.), मुंबई यांच्याकडून दि.२४.०१.२०२० व दि. ३१.०१.२०२० रोजीचा अहवाल आयोगास प्राप्त झालेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अहवालासोबत तक्रारकर्ता यांचे पत्र दि. २७.०१.२०२० संलग्न केलेले आहे. त्यामध्ये तक्रारकर्ता यांनी असे नमुद केले की, मी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) पी/ उत्तर यांच्याकडून विनामुल्य मिळालेली आहे, यास्तव सदर बाबत मी समाधानी असून सदर विषयाबाबत माझी तक्रार दफ्तरी दाखल करण्यात यावी.

..२/-

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता (व्ही.सी. माध्यमाव्दारे) व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांचे पत्र दि. २७.०१.२०२० आयोगाच्या निदर्शनास आणून नमुद केले की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. तक्रारकर्ता यांनी असे सादर केले की, त्यांना माहिती मिळालेली आहे, त्याबाबत त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. २७.०१.२०२० रोजी लेखी दिलेले आहे.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती मिळालेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

प्रदीप व्यास 28-3-2025

**मुंबई**
**दिनांक : २८.०३.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**